नोंदणी क्रं. RNI. MAHMAR/2023/84162
Registration No. MAHMAR/2023/84162

# दैनिक यश सिद्धि न्यूज

YASH SIDDHI NEWS

संपादक : कमलाकर सोनकांबळे

वर्ष - ४ रे | अंक - ९२ | वार - बुधवार दि. २६ ऑगस्ट २०२६ | ई-पेपर - https://epaper. yashsiddhinews.com | पाने - ४ | किंमत - ४.०० रुपये | पोस्टल परवाना : SLP/298/2024-2026
Year - 4rd | Issue - 92 | Blow- Wednesday Date 26 AUGUST 2026 | वेब पोर्टल - www.yashsiddhinews.com | Pages - 4 | Amout - 4 /- Rs | ई-मेल आयडी yashsiddhinews@ gmail.com



दैनिक
# यश सिद्धि न्यूज



## संपादकीय....

### ट्रम्पची कारवाई

अमेरिका आणि इराणमधील वाढत्या राजकीय तणावाच्या पार्श्वभूमीवर राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी तेहरानला मदत करणाऱ्या देशांवर कारवाई करण्यास सुरुवात केली आहे.अमेरिकेचे अर्थमंत्री स्कॉट बेसेंट यांनी इराणला आर्थिकदृष्ट्या एकाकी पाडण्यासाठी सोमवारी 'ऑपरेशन इकॉनॉमिक आउटकास्ट'ची घोषणा केली. त्यानंतर ट्रम्प प्रशासनाने इराणकडून पेट्रोलियम आणि पेट्रोकेमिकल उत्पादनांची आयात केल्याप्रकरणी भारता-तील चार कंपन्यांवर निर्बंध लादले आहेत. इराणसाठी संभाव्य महसुलाचे स्रोत रोखण्याच्या उद्देशाने अमेरिकेने हे नवे निर्बंध लागू केले आहेत. तसेच, इतर देशांनीही इराणसोबतचे आर्थिक संबंध तोडावेत, असे अमेरिकेने आवाहन केले असून, तसे न केल्यास कारवाईचा इशारा दिला आहे.अमेरिकेच्या परराष्ट्र विभागाने सांगितले की, या कारवाईच्या कक्षेत भारतातील कस्टम ड्युटी ब्रोकर पोर्टईज पार्टनर्स एलएलपी तसेच त्यांचे भागीदार इंदरीसमिया अशरफमिया शेख आणि हरीश रामचंद्र रंगी यांचा समावेश आहे. या व्यक्तींनी इराणमधून पेट्रोकेमिकल उत्पादनांच्या अनेक खेपांची आयात करण्यास मदत केली होती. रिपोर्टनुसार, निर्बंधांच्या कक्षेत आलेल्या इतर कंपन्यांमध्ये सदाशिव ओव्हरसीज लिमिटेड, पीपी सॉफ्टटेक प्रायव्हेट लिमिटेड आणि प्रकृतिस इन्फ्रा इम्पेक्स प्रायव्हेट लिमिटेड यांचा समावेश आहे. पीपी सॉफ्टटेकचे संचालक प्रशांत गर्ग यांच्यावरही कारवाई करण्यात आली आहे. निवेदनानुसार, शेख, रंगी आणि गर्ग हे तिघेही भारतीय नागरिक आहेत. सदाशिव ओव्हर-सीजने सुमारे ६.९ कोटी डॉलर किमतीच्या इराणी पेट्रोलियम उत्पादनांची आयात केली. तर पीपी सॉफ्टटेक आणि प्रकृतिस इन्फ्रा यांनी प्रत्येकी सुमारे २.५ कोटी डॉलर किमतीच्या पेट्रोलियम उत्पादनांची आयात केली. इराणकडून पेट्रोलियम किंवा पेट्रोलियम उत्पादनांची खरेदी, अधिग्रहण, विक्री, वाहतूक किंवा विपणनाशी संबंधित महत्त्वाच्या व्यवहारांमध्ये जाणूनबुजून सहभागी झाल्याच्या आरोपावरून या कंपन्यांना निर्बंधांच्या यादीत टाकण्यात आले आहे. अमेरिकेच्या परराष्ट्र विभागाचे प्रवक्ते टॉमी पिगॉट यांनी निवेदनात म्हटले, इरा-णी राजवटीच्या अस्थिरता निर्माण करणाऱ्या कारवायांना मदत करणाऱ्या अनेक संस्था, व्यक्ती आणि जहाजांविरोधात अमेरिकेने व्यापक कारवाई केली आहे.

## डॉ.श्रीहरी बुडगेमवार यांना शाहू महाराज दायित्व प्रेरणा पुरस्कार जाहीर!



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

लातूर:- सुधाकर रणदिवे, मुखेड येथील सामाजिक कार्यकर्ते,तसेच गोरगरीब जनतेसाठी अहोरात्र न्याय व हक्कासाठी लढा देणारे श्रीहरी राजाराम बुडगेमवार यांना छत्रपती शाहू महाराज दायित्व प्रेरणा पुरस्कार जाहीर करण्यात आला आहे.

डॉ श्रीहरी बुडगेमवार हे गेली २० वर्षापासुन दवाखाना, पोलीस स्टेशन,कोर्ट, शालेय होतकरु गरीब विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वाटप, गोरगरीब मुलींच्या लग्नासाठी सहकार्य, आर्थिक दृष्ट्या दुर्बल घटकातील विद्यार्थ्यांना फीस भरण्यासाठी सहकार्य,तसेच सामाजिक समता एकोपा,कायम राहण्यासाठी नेहमी प्रयत्नशील असतात. वृक्ष लागवडीसाठी त्यांचे नेहमी योगदान असते.अशा हरहुन्नरी समाजसेवकाची निवड केल्याबद्दल परिसरात त्यांचे स्वागत केले जात आहे.

या निवडीवेळी संस्थापक अध्यक्ष श्रीराम घुले, तसेच संस्थापक सचिव डॉ.सुफी सय्यद शमशोद्दीन, यांच्या आदेशानुसार निवड करण्यात आली. यावेळी.प्रदेशाध्यक्ष अनिस खान पठाण, प्रदेश संघटक सिद्धार्थ कवठेकर,उषाताई धावारे, सुरेखा घोडके, सहारा शेख, चंद्रकांत वायाळ, विनायक काळे, उद्धव जाधव, राणी माळी, जान्हवी सोनसळे, प्रियंका गायकवाड,छाया कळसे ,कय्युम सय्यद ,अविनाश वाघ , विष्णू आदमाने , आकाश कांबळे , महादेव मांदळे , ईत्यादि पदाधिकारी उपस्थित होते .

# आंबेडकरी चळवळीला वाहून घेतलेले सर्वमान्य नेतृत्व लोकनेते राजाभाऊ सरवदे

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर जिल्ह्यात फुले शाहू आंबेडकरांचे विचार घेऊन सोला-पूर शहर व जिल्हात आंबेडकरी चळवळ उभे करणारे राजाभाऊ सरवदे यांचा जन्म मिलिंद नगर बुधवार पेठ येथे २६ ऑगस्ट १९५८ रोजी सरवदे घराण्यात झाला . राजाभाऊ सरवदे यांचे प्राथमिक शिक्षण मनपा शाळा क्रमांक ११ मधून झाले आणि महाविद्यालय शिक्षण जैन गुरुकुल आणि दयानंद कॉलेज येथे झाले. सोल-ापूर जिल्हा हा मूळतः अनेक चळवळीचा जिल्हा म्हणून ओळखला जातो आणि या चळवळीत राजाभाऊ सरवदे यांची जडणघडण झाली. सन १९७४-७५ साली जैन गुरुकुल ला असताना तेव्हाची जुनी अकरावी या महाविद्यालयीन वयातच चळवळींशी राजाभाऊंचा जवळचा संबंध आला . त्यावेली बिहारचे बेलचे प्रकरण, दलित अत्याचार वरळीची दंगल, या सर्व प्रश्नांवर मुंबईमध्ये १ जुलै १९७१ साली राजाभाऊ, नामदेव ढसाळ, भाई संगारे यांनी दलित पँथरची स्थापना केली .आणि दलिताच्या अत्याचाराला आक्रमकपणे वाचा फोडली दलित पँथर वाऱ्यासारखी राज्यात व देशात पसरत असताना १९७४ साली सोलापुरातील सुभाष चौक येथे त्या वेळचे तत्कालीन संचारचे संपादक श्री रंगा अण्णा वैद्य यांच्या अध्यक्षतेखाली राजा डाले आणि प्राध्यापक अरुण कांबळे यांची दलित पँथरची सभा झाली. प्राध्यापक अरुण कांबळे यांचे आक्रमक भाषण झाले. आणि ही सभा उधळण्याच्या प्रयत्नाने दंगा उसळला आणि डॉ .बाबासाहेब आंबेडकर यांच्या फोटोवर दगडफेक करत असताना त्यावेळी राजाभाऊ सरवदे आणि राजा इंगळे यांनी तो फोटो हातात घेऊन त्या फोटोला सुरक्षित ठिकाणी घेऊन गेले . तिथूनच खऱ्या अर्थाने राजाभाऊंचा संघर्ष सुरू झाला होता. त्यानंतर पँथरचा झंजावात फोफावत असताना सोलापूर जिल्ह्यामध्ये पँथर चे नेतृत्व बी. के. सीतासावंत, एस आर गायकवाड सारखे वरिष्ठ व्यक्ती करत होते आणि दयानंद कॉलेजमधूनच के. पी. गायकवाड बी. के सीतासावंत यांच्या बैठका चालायच्या . महाविद्यालयातच १९७७ साली राजाभाऊ सरवदे यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्टुडेंट असोसिएशन ही संघटना कार्यान्वित करून विद्यार्थी आणि दलित चळवळीचे प्रश्न सोडवण्यास सुरुवात केली .महाविद्यालयीन वयातच राजाभाऊ सरवदे चळवळीशी एकरूप होत गेले .पुढे १९७५ ला शंकराव चव्हाण मुख्यमंत्री असताना दलित अत्याचार दलित प्रश्न यांच्यावर अतिशय आक्रमकपणे काम करणाऱ्या दलित पँथरचे विसर्जन करावे यासाठी राजा ढाले आणि नामदेव ढसाळ यांच्यावर दबाव आणला गेल्यामुळे दलित पँथरच विसर्जन झालं पुढे १९७७ ला सोलापूर मध्ये मोठी दंगल उसळली. दोन दिवस संचारबंदी होती आणि त्या दंगली मध्ये राजाभाऊ सरवदे यांनी आंदोलन यशस्वीपणे हाताळले व शहरात शांतता प्रस्थापित केली.दलित पँथरच्या विसर्जना नंतर पुढे दुसऱ्या टप्यामध्ये रामदास आठवले, अविनाश महाते, गंगाधर गाडे, प्रीतमकुमार शेवगावकर, यांची औरंगाबाद येथे बैठक होऊन वाढत चाललेल्या दलित अत्याचार आणि दलित प्रकरणांवर भारतीय दलित पँथरची स्थापना झाली, आणि राजाभाऊ सरवदे यांनी रामदासजी आठवले यांच्या समवेत भारतीय दलित पँथरच काम सुरू केलं .रामदासजी आठवले आणि राजाभाऊ सरवदे यांचा संबंध भारतीय दलित पँथर मुळेच आला .१९७९ ला अरुण कांबळे अध्यक्ष असलेल्या भारतीय दलित पँथरचे रामदास आठवले हे संघटक होते. ते सोलापूरला बैठकीला आले असता खणी येथे बैठक संपन्न झाली या बैठकीला राजाभाऊ सरवदे उपस्थित होते . तेव्हाच्या बैठका या कार्यकर्त्यांच्या घरात महाविद्यालय कॉलेज वस्तीगृह येथे चालायच्या सोलापुरातील दयानंद महाविद्यालयातील एस. के कांबळे यांच्या रूमवर रामदास आठवले राहायचे तिथेच बैठका घ्यायचे. त्यांच्या समवेत राजाभाऊ सरवदे असायचे त्यांच्या प्रयत्नामुळे सोल-ापूर जिल्ह्यातील प्रश्नांना वाचा फुटायची. संघटने बाबत निर्णय व्हायचे आक्रमक शैली अभ्यासू वृत्ती आणि कुशल संघटन हे गुण रामदास आठवले यांनी राजाभाऊ सरवदे यांच्यात आधीपासूनच ओळखले होते. सोलापूर शहराचा विचार करायचा झाल्यास १९८२ पासून शहरात बुधवार पेठ आताचे मिलिंद नगर थोरला राजवाडा दलित विरुद्ध पत्रा तालीम हा संघर्ष नेहमी चालायचा तो संघर्ष मिटवण्याचे काम राजाभाऊ सरवदे यांनी केले. १९७८ ला मराठवाडा नामांतराचा ठराव झाला आणि मराठवाड्यसह महाराष्ट्रात मोठ्या प्रमाणात दंगली आणि दलितांच्या अन्यायात मोठ्या प्रमाणात वाढ झाली . दलितांची घरे जाळण्याचे प्रकार देखील झाले त्यावेळी अनेक आंदोलनामध्ये राजाभाऊंनी भाग घेतला मराठवाडा विद्यापीठाला डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे नाव मिळावे यासाठी राजाभाऊ सरवदे यांनी तब्बल २६ हजार मोर्चे काढले हा एक विक्रमच म्हणावा लागेल . राजाभाऊ सरवदे हे सत्याच्या संघर्षातून तयार झालेलं नेतृत्व आहे . १९२७ साली डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी महार मांग परिषदेमध्ये थोरला राजवाडा असे नाव दिले त्यामुळे या वस्तीला जोपासण्याचे काम राजाभाऊ सरवदे यांनी आजतागायत केल आहे. १९८१ च्या काळात राजाभाऊ सरवदे हे एमपीएससी परीक्षा पास झाले होते. त्यानंतर त्यांनी कृषी विभाग सार्वजनिक बांधकाम विभाग महाराष्ट्र वित्तीय महामंडळ मुख्य कार्यालय मुंबई येथे ८९ दिवस नोकरी केली परंतु आंबेडकरी बाणा रक्तातच असल्याने त्यांनी आपले पुढचे



आयुष्य हे समाजसेवेला आणि चळवळीला अर्पण केले . ३१ ऑगस्ट १९८२ रोजी महाराष्ट्राचे तत्कालीन मुख्यमंत्री बॅरिस्टर बाबासाहेब भोसले यांची सभा राजाभाऊ सरवदे आणि सहकारी यांनी उधळून ला-वली त्याला कारण होते नामांतर लढा! दलित अत्याचार व प्रश्नावर १९८२ सालची जिल्हा नियोजनाची बैठक देखील राजाभाऊ सरवदे यांनी उधळून लावली होती. ते १९८९ च्या दुसऱ्या भारतीय दलित पँथर च्या अधिवेशनाचे अध्यक्ष देखील होते. नुसती चळवळ करून पोट भागत नाही त्यासाठी कार्यकर्त्यांनी उद्य-ोग व्यवसाय उभारावा हे त्यांचे प्रामाणिक मत ! यासाठी १९८६ रोजी त्यांनी टेम्पो घेतला. टेम्पो ते आताचा मध्यवर्ती भागा-तील असणारा टू स्टार राज-हाईट्स चे हॉटेल त्यांच्या संघर्षाची कहाणी सांगतो चळवळ आणि पक्षातील काम यात मोठा फरक असतो असे ते मानतात एक पक्ष एक नेता एक झेंडा हे सूत्र त्यांनी आयुष्यभर जोपासले आपल्या नेत्याचा शब्द कधी खाली पडू दिला नाही पक्ष, नेतृत्व, चळवळ बदनाम होईल असे कृत्य त्यांच्या हातून कधीच घडले नाही आपला नेता सांगेल ते धोरण ते बांधतील तेच तोरण या वृत्तीने त्यांनी ४६ वर्ष रामदास आठवले यांच्या सोबत चळवळीच, रिपब्लिकन पक्षाचं काम केलं . १९९९ ला उत्तर सोलापूर विधानसभा मतदारसंघातून त्यांनी आपल्या नेत्याच्या आग्रहास्तर विधानसभा देखील लढवली त्यावेळी राष्ट्रवादी आणि रिपब्लिकन पक्षाची युती असताना देखील लक्ष्मण माने यांच्या बंडखोरीचा सामना पक्षाला करावा लागला, परंतु न खचता त्यांनी १ ऑगस्ट २००४ साली सोला-पूर विद्यापीठ स्थापन झाल्यानंतर २०१७ साली त्यांनी सिनेट निवडणूक लढवली आणि ते विक्रमी मताने निवडून आले . आताच्या विद्यापीठांमध्ये जे अमुलाग्र बदल घडत आहेत त्यात राजाभाऊ सरवदे यांचा वाटा निश्चितच आहे. संघर्षातून तयार झालेले हे नेतृत्व कधीच कुठल्या आमिषाला बळी पडले नाही . २०१४ ला सोलापुरात लोकसभा, विधानसभेत बदल घडून आला, त्यात राजाभाऊ सरवदे यांचा वाटा मोठा आहे. चळवळीशी एकनिष्ठ आणि प्रामाणिकपणा यामुळे ३० ऑगस्ट २०१९ रोजी रामदासजी आठवले यांनी महायुतीच्या माध्यमातून राज्यमंत्री दर्जा असलेल्या महात्मा फुले आर्थिक विकास महामंडळाची सूत्रे राजाभाऊ सरवदे यांच्याकडे दिली.

या संधीचं सोनं करत मोडकळीस आलेल्या महामंडळाला राजाभाऊ सरव-दे यांनी नव संजीवनी दिली . अनेक क्रांतिकारी निर्णय घेऊन राज्यातील मागासवर्गीय तरुणांना जवळजवळ १०० कोटी रुपयाचे कर्ज वाटप करून तरुणांना स्वावलंबी होण्यास मदत केली. शिक्षणामुळे प्रगती होते आणि माणूस घडतो पर्यायाने समाज घडतो म्हणून भुगाव येथे नालंदा शैक्षणिक संस्थेची उभारणी केली. तेथे अनेक विद्यार्थी शिक्षण घेतात त्या विद्यार्थ्यांसाठी वस्तीगृहाची स्थापना केली. संपूर्ण महाराष्ट्र हादरवणाऱ्या खैरलांजी घटनेच्या वेळी आणि त्यानंतर उद्भवलेल्या आंदोलनात राजाभाऊ सरवदे यांनी सोल-ापूर शहरात समाजाचे रक्षक म्हणून भूमिका अदा केली. ज्यावेळी अनेक आंबेडकरी तरुणांवर गुन्हे दाखल होत होते तेव्हा राजाभाऊ सरवदे हे प्रशासनापुढे एकटे उभे ठाकले आणि परिस्थिती मोठ्या चालाकीने हाताळली. सोलापूर शहराला किंबहुना मिलिंद नगरला गुन्हेगारी, वाद विवाद यांच्या मधून बाहेर काढून प्रगतीपथावर नेण्याचे श्रेय राजाभाऊ सरवदे यांना जातं . रिपब्लिकन पक्षात काम करत असताना सोलापूर जिल्ह्यात त्यांनी अनेक तरुणांना मोठं केलं. स्वबळावर जिल्ह्यात नगरसेवक पंचायत समिती सदस्य ग्रामपंचायत सदस्य सरपंच, उपसरपंच निवडून आणले. ज्या पक्षासोबत यूती असेल त्या युतीचं काम त्यांनी प्रामाणिकपणे केलेले आहे आणि त्याचे फायदे देखील आज जिल्ह्यात पाहायला मिळतात. आज प्रत्येक गावामध्ये वाड्या वस्त्या मध्ये पुढारी, नेता होण्याचं जणू एक पेवच फुटले आहे . लवकरात लवकर लोकांनी नेता म्हणावं अशी होडच लागलेली आहे पण संघर्ष आणि संयम हे राजाभाऊ यांच्याकडून कडून शिकल पाहिजे . नेता होता येत नसतं लोकांनी नेता मानलं पाहिजे आणि त्यासाठी प्रखर संघर्ष त्याग प्रामाणिकपणा आणि लोकांच समाधान हे महत्वाचं सूत्र आहे आणि हे राजाभाऊंनी नेहमी अंगीकारले आहे. वरून ताठर दिसणारे हे व्यक्तित्व समाजावर आपल्या कार्यकर्त्यावर तेवढेच निर्मळ प्रेम करतात .



आज जिल्हामध्ये दशकातील अनेक नेत्यांचा विचार करायचा झाल्यास त्यामध्ये राजाभाऊ सरवदे यांचं नाव अग्रस्थानी निश्चितच कोरल जाईल. नुसत्या नावानेच काम होतात अशी आ-ोळख असलेले दमदार व्यक्तिमत्व म्हणजे राजाभाऊ सरवदे! काम कोणतेही असो ते राजाभाऊ सरवदे यांनी केलं नाही असं कधीच झालं नाही. अनेक जाती धर्माचे पक्षाचे संघटनेचे लोक राजाभाऊंकडे कामे घेऊन येतात, आणि समाधानी होऊन जा-तात . हीच राजाभाऊ सरवदे यांची ओळख आहे. पक्ष चळवळ याच्याशी राजाभाऊ सरयदे यांनी कधीच तडजोड केली नाही अन्यथा या उंचीचा नेता कधीच आमदार, खासदार, मंत्री म्हणून दिसला असता. सोलापूर जिल्ह्यात आंबेडकरी चळवळीचा पोलादी पुरुष म्हणून त्यांची ओळख आहे तसेच आपला आक्रमकपणा प्रामाणिकपणा एकनिष्ठता यामुळे राजाभाऊंच वेगळेपण दिसून येतं आणि शहर जिल्ह्यात तशीच त्यांची ओळख आहे . आक्रमक संघर्षातून तयार झालेल नेतृत्व कार्यकर्त्यांना ताकद बळ देण्याची वृत्ती, नेहमी समाजाच्या हिताचा विचार यामुळे राजाभाऊ सरवदे पँथर कालीन वृद्धांपासून ते आजकालच्या फेसबुक ,इंस्टाग्राम ट्विटर च्या जमान्यातील इन्स्टंट समजल्या जाणाऱ्या तरुणांच्या गळ्यातील ताईत बनलेले आहेत. ते नेहमी नवीन जगाशी अपडेट असतात . ते नवीन गोष्टी शिकून घेत असतात त्यामुळे त्यांची शैली ही वेगळीच आहे. राजाभाऊ सरवदे हे आपल्या खास केस रचणेमुळे आपल्या विशिष्ट पोशाखामुळे देखील शहर जिल्यामध्ये प्रसिद्ध आहेतच. रुबाबदार व्यक्तिमत्व, बोलण्याची लकब अनेकांची जिव्हाळ्याचे संबंध यामुळे त्यांच्याकडे ओढीने येणाऱ्याची रिघ लागलेली असते. परिस्थितीमुळे स्वतःला वकील होता आलं नाही म्हणून त्यांनी आपल्या एका मुल-ाला वकील केलं. वकील झालो नाही पण वकिलाचा बाप झालो असे ते आवर्जून सांगतात. पुढे त्यांचा वारसा अनेक सामाजिक उपक्रमातून त्यांचे दूसरे सुपुत्र सुशील सरवदे यांनी सुरू ठेवल्याचे दिसून येते . आज त्यांचा वाढदिवस आणि त्यांच्या वाढदिवसाच्या निमित्ताने त्यांच्या कार्याला दिलेला हा ओझरता उज-ाळा ..सर्व मोठी माणसे नेहमी वृद्ध होत असतात पण राजाभाऊ सरवदे यांच्याकडे पाहिले तर आपल्याला ते प्रत्येक वाढदिवसाला चिरतरुण होत आहेत की काय असा भास होतो. यामागे त्यांचा निर्व्यसनी स्वभाव व्यायामाची आवड आणि दररोज सकाळी चालणे ही सवय आहे. अशा अशा चिरतरुण दमदार दिमागदार रुबाबदार, दमदार आणि संघर्षशील नेत्यास वाढदिवसाच्या मनःपूर्वक शुभेच्छा

**– प्रा. राहुल सिद्राम रुही**
**पुणे , महाराष्ट्र**



(दि.२६ ऑगस्ट २०२६ वार मंगळवार रोजी रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आठवले) चे महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष मा.राजा भाऊ सरवदे साहेब सोलापूर यांचा वाढ दिवस आहे. त्या निमित्ताने अभिष्टचिंतनपर लेख....)

# रिपब्लिकन चळवळीतील बहुजनाच खंबिर नेतृत्व : राजा भाऊ सरवदे

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

षमहामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी बहुजनांना भारतीय संविधानाच्या माध्यमातून मूलभूत हक्क आणि मानवी अधिकार घटनात्मक दृष्ट्या मिळवून दिले परंतु जोपर्यंत सत्तेची चावी बहुजनांच्या हाती येत नाही तोपर्यंत खऱ्या अर्थाने बहुजनाचा विकास होत नाही हे मर्म जाणून महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी बहुजनांच्या न्याय हक्कासाठी संघर्ष करण्याकरिता व देशाच्या सत्तेत जाण्याकरिता रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया या पक्षाची संकल्पना खुल्या पत्रातून मांडली.

डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या खुल्या पत्रावर आधारित स्थापन झालेल्या आणि सध्यस्थितीत नामदार रामदाजी आठवले साहेब यांच्या नेतृत्वाखाली असलेल्या रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आठवले) पक्षाची चळवळ देशातल्या कानाकोपऱ्यात पोहोचविण्याकरिता केंद्रीय आणि राज्य कार्यकारणितील अनेक निष्ठावंत बुद्धिजीवी कार्यकर्ते काम करीत आहेत. सत्तेतील वाटा मिळो किंवा न मिळो पण बाबासाहेबांचा विचार डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या संकल्पनेतील पक्ष जिवंत राहावा आणि आपल्या न्याय हक्कासाठी सत्ताधारी पक्षावर किमान योग्य तो अंकुश ठेवण्यासाठी कार्यकर्ते नेते अत्यंत निष्ठने आणि संपूर्ण ताकतीने रिपब्लिकन पक्षाचे काम करीत आहेत.त्यामध्ये सोलापूरचे सुपुत्र बहुजनांचं खंबीर नेतृत्व रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाचे महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष तथा महात्मा फुले मागासवर्गीय आर्थिक विकास महामंडळाचे माजी चेअरमन नामदार राजा भाऊ सरवदे यांचे नाव अग्रक्रमाने घ्यावे लागेल.

सोलापूर येथील दयानंद महाविद्यालयात शिक्षण घेत असताना डॉ.बाबासाहेब आंबेडकर स्टुडन्ट असोसिएशनच्या माध्यमातून आपल्या सामाजिक राजकीय आणि शैक्षणिक चळवळीला सुरुवात करणारे राजा भाऊ सरवदे यांचं नेतृत्व म्हणजे समाजकारण जोपासत राजकारण करणारे खंबीर असे नेतृत्व होय. विद्यार्थी दशेमध्ये विद्यार्थी संघटनेच्या माध्यमातून काम करत असतानाच महाराष्ट्रात नामदार रामदास आठवले यांच्या नेतृत्वाखाली भारतीय दलित पँथरचा झुंजावात सुरू असतानाच पँथर रामदास आठवले साहेब यांची भेट राजाभाऊ यांना झाली आणि त्याचक्षणी त्यांनी रामदासजी आठवले साहेब यांच्या नेतृत्वाखाली पँथरच्या चळवळीमध्ये उडी घेतली आणि सोलापूर शहरातीलच नव्हे तर जिल्ह्यातील सर्व तालुक्यातील तमाम खेडोपाड्यात जाऊन भारतीय दलित पँथरच्या माध्यमातून शाखा स्थ-ापन करून त्यांनी गोरगरीब जनतेवर होणाऱ्या अन्याय अत्याचाराला वाचा फोडण्याचे काम केलं करित आहेत. दरम्यानच्या काळात मराठवाडा विद्यापीठ औरंगाबादला डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे नाव दिलं पाहिजे यासाठी विद्यापीठ नामांतराची चळवळ चालू होती.या नामांतराच्य लढाईमध्ये ही राजा भाऊ अग्रेसर होते. विद्यापीठ नामंतरासाठी अनेक मोर्चे आंदोलने काढून मराठवाडा विद्या-पीठ औरंगाबादचे डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ औरंगाबाद असा नामविस्तार होईपर्यंत राजा भाऊंचा लढा हा रामदासजी आठवले साहेब यांच्या नेतृत्वाखाली चालूच होता. सन १९८९ ला दलित पँथरचे विलीनीकरण महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या संकल्पनेतील रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया मध्ये करण्यात आले.त्या दिवसापासून ही राजाभाऊ सरवदे यांनी नामदार रामदास आठवले साहेबांच्या नेतृत्वाखाली रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया या पक्षाच्या कामाला सुरुवात केली. पक्षाच्या माध्यमातून त्यांनी अनेक मोर्चे आंदोलने काढून उपेक्षितांच्या गोरगरिबांच्या अन्याय अत्याचाराला वाचा फोडली. विद्यार्थ्यांच्या समस्या सोडवण्यात त्यांचा मोठा हात खंड आहे. डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे विचार आत्मसात करून त्यानी समाजकारण, राजकारणा बरोबरच शैक्षणिक चळवळीवर ही भर दिला.विद्यार्थ्यांना शिक्षण घेत असताना येणाऱ्या अडीअडचणींनी राजाभाऊ यांनी सोडविल्या.एवढ्यावर न थांबता स्वतः एक शिक्षण संस्था ही स्थापन केली आणि डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचा शिका!संघटित व्हा! संघर्ष करा! हा मूलमंत्र प्रत्यक्ष कृतीतून त्यांनी जोपासला व जोपासत आहेत.

सोलापूर येथे रिपब्लिकन पक्षाच्या वतीने त्यानी संघर्ष मेळाव्याचे आयोजन करून एक प्रचंड ताकद सोलापूर जिल्ह्यात असल्याचे दाखवून दिले.अनेकांनी रामदास आठवले साहेबांच्या नेतृत्वाखाली काम करत सत्ता मिळवली पद मिळवले आणि नंतर आठवले साहेबांची साथ सोडून स्वतःच नेते झाले पण राजाभाऊ सरवदे यांचं मोठेपण यातच आहे की त्यांनी गेली ४० ते ४५ वर्ष एक पक्ष एक नेतृत्व एकच झेंडा यापासून ते कधीच तसूभर ही ढळले नाहीत. सत्तेतील वाटा मिळो न मिळो पद मिळो किंवा न मिळो पण एकच नेतृत्व म्हणजे रामदास आठवले साहेब एकच पक्ष म्हणजे रिपब्लिकन पक्ष एकच झेंडा तो म्हणजे निळा झेंडा अशा एकनिष्ठतेचा प्रवास आजतागायत चालू आहे. सध्या महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष म्हणून ते रिपब्लिकन पक्षाचं नेतृत्व संबंध महाराष्ट्रभर करतात. त्यांच्या प्रामाणिकपणे निष्ठेने करत असलेल्या कामाचं फळ म्हणजे सन २१८ मध्ये राज्य मंत्री पदाचा दर्जा असलेल्या महात्मा फुले मागासवर्गीय आर्थिक विकास महामंडळाच्या चेअरमन पदी झालेली निवड होय. काम आणि निष्ठाच त्यांच्यापर्यंत पद आणि सत्ता घेऊन आले. असं म्हटलं तर वावग ठरत नाही. रिपब्लिकन पक्षाचे महाराष्ट्राचे सरचिटणीस म्हणून केलेलं काम सरचिटणीस पद असेल त्यानंतर रिपब्लिकन पक्षाचे महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष म्हणून झालेली निवड असेल आणि महात्मा फुले मागासवर्गीय आर्थिक विकास महामंडळाचे चेअरमन म्हणून मिळालेली संधी असेल हे सर्व त्यांच्या एकनिष्ठतेचा प्रामाणिकपणे केलेल्या जनतेच्या सेवेची त्यांना मिळालेलं पावती आहे. आजही ते तितक्याच ताकतीने तितक्याच जोमाने तितक्याच विश्वासाने आणि तितक्याच निष्ठेने ते रिपब्लिकन पक्षाचं नामदार रामदास आठवले साहेब यांच्या नेतृत्वाखाली काम करतात. तरुणांना लाजवेल असं काम त्यांच आहे. राजाभाऊ सरवदे म्हणजेच आंबेडकर चळवळीतील कार्यकर्त्यांची शक्ती प्रेरणा स्रोत आहे असंच म्हणावं लागेल.रिपब्लिकन पक्षाच्या माध्यमातून महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे सामाजिक शैक्षणिक राजकीय विचार सर्वत्र तळागाळातील जनते पर्यंत पोहचंविण्याच कार्य राजाभाऊ सरवदे हे प्रामाणिकपणे करीत आहेत.

परमपुज्य बौध्दीसत्व महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर यानी दि.१४ ऑक्टोबर १९५६ रोजी बौद्ध धम्माची दीक्षा घेऊन ऐतिहासिक धम्म क्रांती केली आणि बहुजनांना स्वाभिमानाने सन्मानाने कर्मकांड मुक्त जीवन जगण्यासाठी बौद्ध धम्म दिला. त्या सदधम्माचे पाईक म्हणून राजाभाऊ सरवदे हे धम्म कार्यातही तितकेच सक्रिय आहेत.त्यांच्या एकूणच कार्याला क्रांतिकारी जय भिम आणि दि.२६ ऑगस्ट हा त्यांचा वाढदिवस आहे. त्यांच्या वाढदिवसानिमित्ताने त्यांना हार्दिक शुभेच्छा.

**– एस. के. गायकवाड**
**मु. पो. वागदरी ता. तुळजापूर**
**मो. न. ९३७००४०२०३**
**( लेखक रिपब्लिकन चळवळीतील कार्यकर्ते आहेत )**

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी मुद्रक, प्रकाशक, संपादक कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार, रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ, सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु. पो. गोगांव ता. अक्कलकोट जि. सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. **संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे** ई-मेल - yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com Mo. 9921988358

This Newspaper is printed by the Owner Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur-413002 (Maharashtra), Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 (Maharashtra). Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

■ **प्रशासकीय कार्यालय** : सम्यक उद्योग समूह, पृथ्वी एंटरप्राइजेस, सर्वे नं. ६५९/८, शॉप नं. ४, राजीव गांधी नगर, न्यू अप्पर बस स्टॉप, बिबवेवाडी पुणे-३७ ■ **विभागीय कार्यालय** : प्रबुद्ध इंटरप्राइजेस, दुकान नं. २ अमरधान चौक, खेमानी उल्हासनगर ४२१००२

# कृषी अधिकाऱ्यांचा एल्गार : प्रस्तावित कृषी आकृतिबंधाविरोधात राज्यभरात आंदोलन

## तांत्रिक संवर्गाला दुय्यम स्थान दिल्याने असंतोष; तहसीलदारांना दिले निवेदन

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

निफाड प्रतिनिधी - राज्य सरकारच्या कृषी विभागाच्या प्रस्तावित नवीन आकृतिबंधातील त्रुटीं विरोधात कृषी तांत्रिक संवर्गाने पुकारलेल्या निषेध आंदोलनाला महाराष्ट्रभरातून उत्स्फूर्त प्रतिसादाची लाट पाहायला मिळत आहे. २४ ऑगस्ट २०२६ पासून राज्यातील सुमारे १७,००० कृषी अधिकारी व कर्मचाऱ्यांनी हातावर काळ्या फिती बांधून शासनाच्या धोरणा-चा तीव्र निषेध नोंदवला आहे.



अतांत्रिक संवर्गाचे उदात्तीकरण: प्रस्तावित आकृतिबंधामध्ये प्रत्यक्ष शेता-वर काम करणाऱ्या तांत्रिक मनुष्यबळाच्या तुलनेत अतांत्रिक (प्रशासकीय) संवर्गाला अनावश्यक महत्त्व दिले गेल्याचा आरोप संघटनांनी केला आहे.

विस्कळीत प्रशासकीय पिरॅमिड: शेतकरी आणि कृषी क्षेत्राच्या विकासासाठी काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांऐवजी केवळ नियंत्रण व पर्यवेक्षण करणाऱ्या वरिष्ठ पदांची संख्या वाढवण्यात आल्यामुळे विभागाचा पारंपरिक प्रशासकीय पिरॅमिड पूर्णपणे ढासळला आहे.

शेतकरी हिताचा विसर: कार्यक्षेत्राचा वाढता विस्तार, ग्रामीण आणि शहरी गरजांमधील फरक तसेच प्रादेशिक असमानता या घटकांचा कोणताही वस्तुनिष्ठ विचार न करता हा आकृतिबंध तयार करण्यात आल्यामुळे कर्मचाऱ्यांमध्ये तीव्र असंतोष पसरला आहे.

निफाड येथे तहसीलदार विशाल नाईकवाडे यांना निवेदन

निषेध आंदोलनाचा भाग म्हणून कृषी महासंघाच्या नेतृत्वाखाली निफाड येथे तह-सीलदार श्री. विशाल नाईकवाडे यांना कृषी महासंघाच्या वतीने निवेदन देण्यात आले.

या वेळी तालुका कृषी अधिकारी श्री. सुधाकर पवार, कृषी अधिकारी संघटना जिल्हा अध्यक्ष श्री. मनोज रोंगटे, सहाय्यक कृषी अधिकारी संघटना जिल्हा उपाध्यक्ष श्री. राहुल साठे, तालुका अध्यक्ष श्री. जयेश निरभवणे, श्री. यो-गेश निरभवणे यांच्यासह इतर अधिकारी मोठ्या संख्येने उप-स्थित होते. तसेच राज्यभरात जिल्हाधिकारी, पोलीस अधीक्षक आणि तहसीलदारांना निवेदने सादर करून आंदोलनाची भूमिका स्पष्ट करण्यात आली आहे.

प्रशासकीय सोयीऐवजी शेतकऱ्यांचे हित केंद्रस्थानी ठेवून, तांत्रिक आव्हानांचा विचार करणारा नवीन आकृतिबंध तयार करावा, अशी ठाम मागणी करण्यात आली आहे. प्रस्तावित आकृतिबंध त्वरित रद्द करून तज्ज्ञ समितीमार्फत सुधारित मसुदा तयार न केल्यास हे आंदोलन अधिक तीव्र करण्याचा इशारा कृषी महासंघाने दिला आहे.

# पडघ्यात राख्यांनी सजली बाजारपेठ; महिलांची खरेदीसाठी गर्दी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

ठाणे प्रतिनिधी मिलिंद जाधव - भाऊ-बहिणीच्या प्रेमाचे प्रतीक असलेल्या रक्षाबंधन सणाला अवघे काही दिवस शिल्लक राहिल्याने पडघा बाजारपेठेत राख्यांची दुकाने सजली असून, विविध रंगांच्या आणि आकर्षक डिझाईनच्या राख्यांनी पडघा बाजारपेठ सजली आहे. रक्षाबंधनाच्या पार्श्वभूमीवर खरेदीसाठी महिलांसह नागरिकांची बाजारपेठेत गर्दी होताना दिसत आहे.



पडघ्यातील मुख्य बाजारपेठ, बसस्थानक परिसर तसेच विविध दुकानांमध्ये राख्यांचे आकर्षक स्टॉल लावण्यात आले आहेत. पारंपरिक राख्यांसोबतच मोत्यांच्या, चंदेरी, कुंदन, कार्टून, फुलांच्या तसेच विविध आकर्षक डिझाईनच्या राख्या ग्राहकांचे लक्ष वेधून घेत आहेत. लहान मुलांसाठी विशेष कार्टून आणि विविध रंगांच्या राख्यांना मोठी मागणी असल्याचे विक्रेत्यांकडून सांगण्यात येत आहे.रक्षाबंधनासाठी आपल्या भावाला आवडणारी राखी निवडण्यासाठी महिला व मुली मोठ्या संख्येने पडघा बाजारात येत आहेत. राख्यांसोबतच मिठाई, भेटवस्तू, कपडे आणि पूजेच्या साहित्याचीही खरेदी केली जात असल्याने बाजारपेठेत उत्साहाचे वा-तावरण निर्माण झाले आहे. ग्राहकांच्या आर्थिक क्षमतेनुसार बाजारात विविध किमतींच्या राख्या उपलब्ध आहेत. साध्या राख्यांपासून आकर्षक आणि डिझायनर राख्यांपर्यंत मोठ्या प्रमाणात पर्याय उपलब्ध असल्याने प्रत्येक ग्राहकाला आपल्या पसंतीची राखी खरेदी करता येत आहे. रक्षाबंधन हा भाऊ-बहिणीच्या प्रेमाचा आणि आपुलकीचा सण असल्याने या सणासाठी नागरिकांमध्ये विशेष उत्साह दिसून येत आहे. बहिणी आपल्या भावाच्या मनगटावर प्रेमाची राखी बांधण्यासाठी उत्सुक असून, भावांकडूनही बहिणींना भेटवस्तू देण्याची तयारी सुरू आहे .रक्षाबंधनाच्या पार्श्वभूमीवर पडघा बाजारपेठेत वाढलेली गर्दी पाहता आगामी दिवसांतही खरेदीची लगबग आणखी वाढण्याची शक्यता आहे. त्यामुळे पडघ्याची बाजारपेठ सध्या राख्यांच्या रंगांनी सजली असून, सणाच्या उत्साहाने फुलून गेली आहे.

# महाआरोग्य शिबिराला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

घाटकोपर,(केतन भोज) - घाटकोपर विभागातील नागरिकांच्या आरोग्याची काळजी घेण्याबरोबरच विविध आजारांचे वेळीच निदान व्हावे,या उद्देशाने शनिवारी,दि. २२ ऑगस्ट रोजी कै. पा. रा. कदम सभागृह येथे भव्य मोफत महाआरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले. आमदार राम कदम यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच भाजपा कार्यकर्त्यांच्या सहकार्याने एन प्रभाग समिती अध्यक्षा व प्रभाग क्रमांक १२९ च्या नगरसेविका अश्विनी भरत मते यांच्या पुढाकाराने या शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. शिबिराला विभागातील नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.यावेळी माजी खासदार ईशान्य मुंबई मनोजभाई कोटक, महाराष्ट्र उपाध्यक्ष विनायक कामत, ईशान्य मुंबई जिल्हाध्यक्ष दीपक दळवी, महामंत्री चंद्रकांत मालकर, उपाध्यक्ष सनद आ-झा, महिला मोर्चा जिल्हाध्यक्ष दीपिका घाग, मुंबई ओबीसी सचिव सूर्यकांत गवळी एन वॉर्ड मुख्य आरोग्य अधिकारी डॉ. रविंद्र हांगे आदी मान्यवर उप-स्थित होते. नागरिकांना एकाच ठिकाणी विविध आरोग्य सुविधा उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने आयोजित करण्यात आलेल्या या शिबिरात रक्तदाब तपासणी, मधुमेह तपासणी, नेत्र तपासणी, दंत तपासणी, मोफत रक्त तप-ासणी तसेच क्षयरोग तपासणी करण्यात आली. तसेच आहारतज्ज्ञ, बालरोगतज्ज्ञ आणि अस्थिरोगतज्ज्ञांकडून नागरिकांची तपासणी करून आरोग्यविषयक मार्गदर्शन करण्यात आले. नागरिकांसाठी आभा कार्ड व आयुष्मान कार्ड नोंदणी, तपासणीनंतर आवश्यकतेनुसार औषधांचे मोफत वाटप तसेच योग प्रशिक्षणाची सुविधाही उपलब्ध करून देण्यात आली. महिलांसाठी विशेष आरोग्य तपासणीचे आयोजन करण्यात आले होते. लहान मुलांचीही आरोग्य तपासणी करण्यात आली.



**नगरसेविका अश्विनी भरत मते यांच्या पुढाकाराने नागरिकांना विविध आरोग्य सुविधा**

आरोग्याबाबत जनजागृती निर्माण करण्याबरोबरच नागरिकांना आवश्यक वैद्यकीय सेवा एकाच छताखाली उपलब्ध करून देणाऱ्या या उपक्रमाचे नागरिकांनी कौतुक केले.शिबिराच्या यशस्वी आयोजनासाठी आयोजक, डॉक्टर, वैद्यकीय कर्मचारी आणि स्वयंसेवकांनी विशेष परिश्रम घेतले.

या वेळी भाजपा तसेच शिवसेना शिंदे गटाचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. शिबिरासाठी सहकार्य करणाऱ्या सर्व पदाधिकारी, कार्यकर्ते, डॉक्टर, वैद्यकीय कर्मचारी व नागरिकांचे एन प्रभाग समिती अध्यक्षा तथा नगरसेविका अश्विनी भरत मते व भरत मते यांनी आभार मानले.

# कै.डी.के.कुलकर्णी यांच्या ७७ व्या जयंती निमित्त मूकबधिर विद्यार्थ्यांना भोजनासाठी ताट व सुरुची भोजन

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

कळंब (प्रतिनिधी) - ज्येष्ठ नागरिक महासंघाचे दक्षिण मराठवाडा कार्यकारणी सदस्य, आदर्श मुख्याध्यापक कै. डी. के. कुलकर्णी सर यांची ७७ व्या जयंती निमित्त श्री संत ज्ञानेश्वर बालकाश्रम कळंब येथे कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून जेष्ठ नागरिक महासंघाचे जिल्हाध्यक्ष महादेव महाराज आडसुळ, प्रमुख पाहुणे म्हणून धाराशिव जिल्हा मुख्याध्यापक संघाचे जिल्हाध्यक्ष सुरेश टेकाळे, संस्थाचालक शहाजी चव्हाण, मुख्याध्यापक बालाजी जाधवर, ज्येष्ठ नागरिक बब्रुवान पांचाळ, चौधरी बाप्पा, माधवसिंग राजपूत, जैन संघटनेची अध्यक्ष बाबू शेठ लोढा, रोटरी क्लब ऑफ कळंब सिटीचे संजय देवडा, धर्मेंद्र शहा, यांची उप-स्थिती होती,कार्यक्रमाच्या सुरुवातीस डि. के. कुलकर्णीसर यांच्या प्रतिमेस उप-स्थित प्रमुख पाहुणे यांनी पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले, यानंतर मूकबधिर बालकांना भोजनासाठी ताट , खेळण्यासाठी चेंडू भेट म्हणून देण्यात आले, व शेवटी सुरुची भोजन देण्यात आले, उपस्थित पाहुणे यांनी डी.के. कुलकर्णी सर यांनी शिक्षण क्षेत्रात, तसेच सामाजिक क्षेत्रात शेवटचा श्वास असेपर्यंत केलेल्या कार्याचा गौरव केला, आदर्श मुख्याध्यापक, ज्येष्ठ नागरिक महासंघाचे दक्षिण मराठवाडा विभाग कार्यकारणी सदस्य, अखिल भारतीय साने गुरुजी कथामाला जिल्हाध्यक्ष म्हणून व कळंब शहरातील प्रत्येक सामाजिक उपक्रमात सक्रिय सहभाग घेऊन आदर्श निर्माण केला आहे असे सांगितले.



कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. गिरीश कुलकर्णी, यांनी पाहुण्याचे स्वागत वेदांत कुलकर्णी, बाळासाहेब यादव, किरण जोगदंड यांनी सूत्रसंचलन सहशिक्षक आश्रुबा कोठावळे यांनी व आभार प्रदर्शन जे.के. कुलकर्णी यांनी केले. कार्यक्रम यशस्वीतेसाठी कुलकर्णी परिवार व संत ज्ञानेश्वर मूकबधिर विद्यालयातील शिक्षक वृंद गोवर्धन चव्हाण, सुनिता गुंड, सुनंदा गायकवाड, तुकाराम आडसूळ, अंकुश गव्हाणे यांनी परिश्रम घेतले.

# निःस्वार्थी, निःस्पृह भावनेने काम करणारे व्यक्तिमत्त्व : मा.संजयजी भोकरे

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

राज्यातील ग्रामीण व शहरी भागात काम करणाऱ्या पत्रकारांना शासनाच्या सर्व सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाच्या माध्यमातून प्रयत्न सुरू आहेत. पत्रकारांच्या विविध समस्या सोडविण्यासाठी शासन स्तरावर पाठपुरावा करण्यात येत असून अनेक प्रश्न मार्गी लागले आहेत. यासाठी राज्य मराठी पत्रकार संघाचे प्रदेश संघटक, दैनिक महानगरी व दैनिक जनप्रवास या दैनिकांचे संपादक तथा अंबाबाई तालिम संस्था मिरज, सांगली या संस्थेचे अध्यक्ष, महाराष्ट्र शासना-चा शिवछत्रपती क्रीडा पुरस्कारप्राप्त, आमचे मार्गदर्शक तथा महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे प्रदेश संघटक संजय भोकरे साहेब प्रयत्नशील आहेत. त्यांच्या वाढदिवसानिमित्त घेत-लेला त्यांच्या कार्याचा आढावा...माननीय संजय भोकरे साहेब यांच्या मार्गदर्शनाखाली सर्व पत्रकार बंधूंनी दीक्षाभूमी ते मंत्रालय संवाद यात्रा काढली, ही यात्रा २८ जिल्ह्यांतील २४८ तालुक्यातून मंत्रालयात पोहचली. पत्रकारांच्या १४ मागण्यांवर मंत्रालयातील यशवंतराव चव्हाण सभागृहात मंत्री नामदार मंगल प्रभात लोढा, नामदार चंद्रकांत दादा पाटील, नामदार पंकजाताई मुंडे यांच्या समवेत चर्चा करण्यात आली. पत्रकारांचे आर्थिक विकास महामंडळ व वृत्तपत्र विक्रेत्यांचे महामंडळ स्थापन करावे, या मागणीवर महायुती शासनाने निर्णय घेण्याचे मान्य केले.डिजिटल मीडियाची स्थापना करून नामदार चंद्रकांत दादा पाटील, आमदार जयकुमार गोरे, आमदार गोपीचंद पडळकर यांना आमंत्रित करून डिजिटल मीडियाचे पहिले अधिवेशन माननीय श्री. भोकरे साहेब यांच्या मार्गदर्शनाखाली घेण्यात आले. या अधिवेशनात डिजिटल मीडियाला मान्यता देण्याची मागणी करण्यात आ-लेली होती, त्या नुसार शासनाकडून ही मागणी मान्य करण्यात आली.महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाच्या माध्यमातून भोकरे साहेबांनी नेहमीच सामाजिक कार्यात सहभाग नोंदवलेला आहे. कोरोना कालावधीत मृत्यू झालेल्या पत्रकारांना संपादकांकडून आर्थिक मदत देण्यात आली. गुणवंत विद्यार्थी तसेच मान्यवरांचा वर्षभर संघाच्या विविध जिल्ह्यातील शाखांमार्फत गौरव केला जातो. गोरगरीब विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वाटप केले जाते. त्याचबरोबर आपत्तीग्रस्त भागात विविध मदत केली जाते. दीपावली सणानिमित्त मिठाई वाटप, पंढरपूर यात्रेत सहभागी वारकऱ्यांना छत्र्या, रेनकोटचे वाटप इत्यादी उपक्रम सातत्याने राबविले जात आहेत.पत्रकार संघाचे राज्यस्तरीय अधिवेशन दरवर्षी घेतले जाते. यावर्षी माननीय नामदार संजय शिरसाठ, माननीय नामदार अतुल सावे यांना अधिवेशनात आमंत्रित करून पत्रकारांचे प्रश्न शासन दरबारी मांडून हे प्रश्न सोडविण्याची मागणी करण्यात आली.ग्रामीण भागात जोडलेली पत्रकारांची मोट महाराष्ट्र राज्यापुरतीच मर्यादित न ठेवता गोवा, दिल्ली, बेळगाव, मध्य प्रदेश, गुजरात, छत्तीसगड, ओडिशा इत्यादी ठिकाणी पत्रकार संघाबरोबरच ऑल इंडिया जर्नालिस्ट संघटनेची स्थ-ापना केली व सर्व पत्रकार बंधूंची मूठ बांधली. अनेक ठिकाणी पत्रकार भवन उभे केले. प्रत्येकाच्या सुखदुःखात सहभागी होणारे असे हे हरहुन्नरी व्यक्तिमत्त्व सर्व पत्रकारांच्या गळ्यातील ताईत बनले आहे.राज्यातील बहुसंख्य




वर्तमानपत्रांचे संपादक तसेच पत्रकार, वृत्तवाहिन्यांचे प्रतिनिधी मोठ्या प्रमाणात महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाशी जोडले गेले आहेत. राज्यातील कोकण, विदर्भ, उत्तर महाराष्ट्र, मराठवाडा, नागपूर, पश्चिम महाराष्ट्र या भागात संघटनेने सभासदांच्या विविध प्रश्नांवर मोर्चे, आंदोलने उभारून पत्रकार संरक्षण कायदा अंमलात आणण्यासाठी सातत्याने प्रयत्न केले, आजत्याला यश मिळालेले आहे. राज्य मराठीपत्रकार संघाच्या माध्यमातून सांगली, सोलापूर, कोल्हापूर, पुणे, मुंबई या ठिकाणी पत्रकार भवन उभारले असून पत्रकारांच्या पाल्यांना शिक्षणात सवलती मिळाव्यात, उच्चशिक्षणातही सवलती मिळाव्यात तसेच राज्य मराठी पत्रकार संघाचा विस्तार विविध राज्यात करण्यासाठी पत्रकार संघाचे प्रदेश संघटक संजय भोकरे प्रयत्नशील आ-हेत. या बरोबरच राज्यातील पत्रकारांना देशाच्या राजधानीत थांबण्यासाठी पत्रकार भवन उभारले आहे. पुणे, औरंगाबाद, मुंबई, कोल्हापूर या ठिकाणी देखील पत्रकार संघाच्या सभासदांसाठी पत्रकार भवन उभारले आहे. सभासदांना संघटनेमार्फत पाच लाख रुपयांचे विमा संरक्षण, शासकीय विश्राम गृहांवर प्राधान्यक्रम, टोल नाक्यावर सवलत, सभासदांच्या पाल्यांना उच्च शिक्षणासाठी राखीव कोटा ठेवण्यासाठी भोकरे साहेब प्रयत्नशील आहेत. अधिस्वीकृतीधारकांनाच राज्य शासनाच्या मोफत रेल्वे, एस. टी., एअरलाईन, शासकीय विश्राम गृहांवर प्राधान्य

दिले जाते. त्यामुळे ग्रामीण भागातील पत्रकारांवर अन्याय होतो. ग्रामीण पत्रकारांना विविध सवलतींचा फायदा देण्याचा प्रयत्न संजय भोकरे यांच्या मार्गदर्शनाखाली केला जात आहे. संघाचे राज्यात विविध ठिकाणी शैक्षणिक उपक्रम सुरू असून सामाजिक नाळ जोडली जात आहे. ग्रामीण भागासह वर्तमानपत्रातील श्रमिक पत्रकार, मुक्त पत्रकार, छायाचित्रकार यांच्या संरक्षणासाठी व संघाने नेहमीच मदतीचा हात पुढे केला आहे. संघटना कोणतीही असो मात्र पत्रकारांना संरक्षण, त्यांच्या कार्याची दखल घेणारी संघटना भविष्यात पत्रकारांना तारू शकते, त्यासाठी संघटनामार्फत विभागनिहाय अधिवेशने, गुणवंत विद्यार्थ्यांचा गौरव, पत्रकार दिन, सांस्कृतिक, सामाजिक, राजकीय, शैक्षणिक क्षेत्रातील मान्यवरांचा गुणगौरव उपक्रम सुरू आहेत. गुणवंतांच्या पाठीवर भोकरे साहेब नेहमीच शाबासकी देत आले आहेत. आज राज्यातील प्रत्येक जिल्ह्यात आणि प्रत्येक तालुक्यात राज्य पत्रकार संघाचे पदाधिकारी आणि सभासद आहेत. शहरी आणि ग्रामीण भागातील पत्रकारांच्या समस्या सोडविण्याचे काम सातत्याने होत आहे. अनेक पत्रकारांना हलाखीच्या परिस्थितीत पत्रकार संपादकांकडून आर्थिक मदत केली जात आहे. संघाचे सभासदांना अधीस्वीकृत कार्ड मिळवून देण्यासाठी प्रयत्न होत आ-हेत. समाजातील विविध घटकांना त्यांनी केलेल्या कार्याबद्दल पत्रकार संघाकडून गौरविण्यात येत आहे. यासाठी मा. भोकरे साहेबांचे मार्गदर्शन मिळत आहे. संघामार्फत उत्कृष्ट पत्रकारिता जीवन गौरव पुरस्कार, सांस्कृतिक, पत्रकारिता राजकीय, सामाजिक, शैक्षणिक कार्य करणाऱ्या व्यक्तींना व संस्थांचा पुरस्कार देऊन गौरव केला जातो. तसेच राज्यभरात पत्रकारांची मूठ बांधण्यासाठी राज्य संघटक संजय भोकरे साहेबांच्या कल्पक नेतृत्वातून संघटनेचा विस्तार राज्याच्या पलिकडे झाला आहे. महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ मा. भोकरे साहेबांच्या मार्गदर्शनाखाली उद्दिष्ट व ध्येयाच्या दिशेने वाटचाल करीत आहे, करीत राहणार आहे. साहेबांना वाढदिवसानिमित्त कोटी कोटी शुभेच्छा!

**- डॉ.विश्वासराव आरोटेप्रदेश सरचिटणीस, म.रा.म.पत्रकार संघ, मुंबई**

# निफाड तालुक्यात शिक्षण विभागाचा भोंगळ कारभार उघडकीस

## इयत्ता दुसरी ते सातवीच्या १,५२७ विद्यार्थ्यांना अद्याप पाठ्यपुस्तकांची प्रतीक्षा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

निफाड प्रतिनिधी : निफाड तालुक्यातील प्राथमिक व माध्यमिक शाळांमधील विद्यार्थ्यांना शासनाकडून देण्यात येणारी मोफत पाठ्यपुस्तके शैक्षणिक वर्ष सुरू होऊन अडीच महिन्यांहून अधिक काळ लोटल्यानंतरही पूर्णपणे उपलब्ध झालेली नाहीत. तालुक्यात तब्बल १,५२७ पाठ्यपुस्तक संचांचा तुटवडा असल्याची माहिती समोर आली असून, पुस्तकांअभावी विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होत असल्याचा आरोप निफाड पंचायत समितीचे माजी सदस्य प्रकाश पाटील यांनी केला आहे.



शासनाच्या शिक्षण विभागामार्फत दरवर्षी इयत्ता पहिली ते आठवीच्या विद्यार्थ्यांना मोफत पाठ्यपुस्तके दिली जातात. शाळा सुरू होण्यापूर्वी आवश्यक पुस्तकांची मागणी नोंदवून त्यांचे जिल्हा, तालुका व केंद्र स्तरावर वितरण केले जाते. मात्र, यंदा शैक्षणिक वर्ष सुरू होऊन अडीच महिन्यांहून अधिक काळ उलटूनही अनेक विद्यार्थ्यांना अद्याप पुस्तके मिळालेली नाहीत.

इयत्ता दुसरी, चौथी आणि सहावीच्या अभ्यासक्रमात बदल झाल्याने जुन्या पाठ्यपुस्तकांचा वापर करणे शक्य नसल्याने विद्यार्थ्यांच्या अडचणी वाढल्या आहेत. काही शाळांमध्ये शिक्षकांनी जुनी पुस्तके जमा करून तात्पुरती व्यवस्था केली असली, तरी नवीन पुस्तके उपलब्ध नसल्याने अध्यापनात अडथळे निर्माण होत आहेत. या गंभीर प्रश्नाबाबत प्रकाश पाटील यांनी निफाड पंचायत समितीच्या गटविकास अधिकारी नम्रता जगताप व सहाय्यक गटविकास अधिकारी सुनील पाटील यांच्याकडे पाठ्यपुस्तकांच्या तुटवड्याबाबत विचारणा केली. त्यावेळी या तुटवड्याची माहिती आपल्यापर्यंत पोहोचली नसल्याचे अधिकाऱ्यांनी सांगितले. विद्यार्थ्यांच्या शिक्षणाशी संबंधित एवढा गंभीर प्रश्न असतानाही शिक्षण विभागाने ही माहिती वरिष्ठ अधिकाऱ्यांपर्यंत न पोहोचविल्याने प्रशासनाच्या कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. विद्यार्थ्यांना शैक्षणिक वर्षाच्या सुरुवातीलाच मोफत पाठ्यपुस्तके मिळणे अपेक्षित असताना अडीच महिन्यांनंतरही त्यांना पुस्तकांची प्रतीक्षा करावी लागत आहे. त्यामुळे पालकांमध्येही नाराजी व्यक्त होत आहे.पाठ्यपुस्तकांचा तुटवडा तातडीने दूर करून सर्व विद्यार्थ्यांना पूर्ण संच उपलब्ध करून द्यावेत, अशी मागणी प्रकाश पाटील यांनी केली आहे.आता प्रशासन याबाबत कोणती उपाययोजना करते, याकडे विद्यार्थी, पालक व शिक्षकांचे लक्ष लागले आहे. यावेळी शिवसेना लासलगाव शहरप्रमुख प्रमोद पाटील, शहर विकास समितीचे राजेंद्र कराड, संदीप उगले यांच्यासह पदाधिकारी उपस्थित होते.

### विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक नुकसानीस जबाबदार कोण..? – प्रकाश पाटील

### प्रशासनाचे आश्वासन

**निफाड तालुक्यात एवढ्या मोठ्या प्रमाणात विद्यार्थ्यांना अद्याप पाठ्यपुस्तके मिळालेली नसल्याची माहिती शिक्षण विभागाने आम्हाला दिलेली नाही. संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांशी तातडीने चर्चा करून माहिती घेऊ व वरिष्ठ अधिकाऱ्यांपर्यंत ती पोहोचवू. विद्यार्थ्यांना वेळेत पाठ्यपुस्तके मिळावीत यासाठी निश्चितच प्रयत्न करू.**

**– नम्रता जगताप, गटविकास अधिकारी, निफाड**

### पाठ्यपुस्तकांचा तुटवडा इयत्ता व अपूर्ण संच

दुसरी..७
चौथी..२७
पाचवी..७६८
सहावी.६१४
सातवी.१११
एकूण.१,५२७

# सीमेवरील जवानांना राख्या पाठवणे हा प्रेरणादायी उपक्रम : शिंदे

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर (प्रतिनिधी) सीमवरील जवानांना राख्या पाठवणे हा प्रेरणादायी उपक्रम असल्याचे प्रतिपादन मुख्याध्यापिका सई शिंदे यांनी केले

पंढरपूर तालुक्यातील कौठाळी येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेतील मुलींनी सीमेवर अहोरात्र लढणाऱ्या वीर जवानांसाठी स्वतः आकर्षक राख्या बनवल्या आहेत. देशाचे रक्षण करणाऱ्या सीमेवरील जवानांप्रती व कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी कौठाळी गावातील युवतींच्या वतीने हा प्रेरणादायी उपक्रम पंधरा वर्षापासून राबविला जात आहे. मुलींना राख्या बनवण्यासाठी मुख्याध्यापिका सई शिंदे,सरिता साळुंखे यांचे मार्गदर्शन लाभले.












